**नोंदणीकृत पदीवधरांमधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता Electoral Roll तयार करण्यासाठी Online नोंदणी करुन माहिती पाठविण्याबाबत.**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON–425001

NAAC Re-Accredited (3rd Cycle)

# निवडणूक शाखा

## नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक

## जाहीर प्रकटन

सर्व संबंधितांना या अधिसूचनेव्दारे कळविण्यात येते की, दि.०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अंमलात आलेला असून त्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांचे गठन करण्याची प्रक्रिया उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाव्दारे सुरु करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (न) अन्वये नोंदणीकृत पदवीधर गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाच्या १० नोंदणीकृत पदवीधरांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या पदवीधरांच्या गटाच्या (Collegium of Graduates of the University) अनुषंगाने निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने आवश्यक तरतुदी/ सूचना खालील- प्रमाणे आहेत :

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १३१ अन्वये विद्यापीठाने ठेवावयाच्या नोंदवहीत खालीलप्रमाणे पदवीधर आपली नावे नोंदवू शकतील :

अ) ज्या उमेदवारांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेली आहे असे पदवीधर, नोंदणीकृत पदवीधर म्हणून नावे नोंदवू शकतील.

ब) नावे नोंदणी करण्यासाठी पुणे विद्यापीठाचे जे पदवीधर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहेत अशा व्यक्ती पदवीधर नोंदवहीत नावे नोंद करु शकतील. तथापि, अशा पदवीधरांनी पुणे विद्यापीठामध्ये जर नावे नोंदविली असतील तर पुणे विद्यापीठांतर्गत केलेली नाव नोंदणी त्यांना रद्द करावी लागेल.

२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १३१ उप कलम २ अन्वये जी व्यक्ती -

(क) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ;

किंवा

(ख) अमुक्त नादार असेल ;

किंवा

(ग) ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आले असेल ;

15/6/17

किंवा

(घ) लबाडीच्या मार्गाने एखादी पदवी मिळविली असेल.

किंवा

(ङ) राज्यात कायद्याव्दारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर असेल : ती व्यक्ती पदवीधरांच्या नोंदवहीत नावे नोंदविण्यासाठी अपात्र असेल.

३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्या नोंदणीकृत पदवीधरांची नावे विद्यापीठाने ठेवलेल्या पदवीधरांच्या नोंदवहीत नमूद करण्यात आली होती, असे नोंदणीकृत पदवीधर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १४७ (२) (ट) अन्वये या विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर मानण्यात येतील. तथापि, ज्या पदवीधरांनी आपल्या नावाची नोंदणी केलेली नाही, त्या पदवीधरांना विद्यापीठाने विहित केलेल्या नमून्यातील Online अर्ज भरावा लागेल.

४) विद्यापीठाने ठेवलेल्या पदवीधरांच्या नोंदवहीत नाव नोंदणीसाठी तसेच नोंदणीकृत पदवीधर गटाच्या निर्वाचक गणामध्ये मतदार म्हणून समावेश होण्यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर www.nmu.ac.in/election या link वर असलेल्या विहित नमून्यात ऑनलाईन माहिती भरावी. भरलेली माहिती अचूक असल्याची खात्री करावी. भरलेल्या माहितीच्या अनुषगाने तयार झालेल्या अर्जाची प्रत व पोच पावती डाऊनलोड करुन प्रिंट घ्यावी. प्रिंट झालेल्या अर्जावर स्वतःची स्वाक्षरी करावी. तसेच अर्जासोबत स्वत: स्वाक्षांकीत केलेल्या पदवीप्रमाणपत्राची प्रत आणि निवासाचा पुरावा जोडावा. सदर अर्ज, पोच पावती आणि आवश्यक कागदपत्र, विद्यापीठाने विहित केलेल्या पुढील केंद्रांवर रु. १२/- मात्र रोख शुल्कासह जमा करावेत व संबंधीत केंद्राकडून अर्ज जमा केल्याची पोच पावती घ्यावी.

| Collection Centre No. | Place of Collection Centre |
|---|---|
| 100 | North Maharashtra University, **Jalgaon** |
| 101 | Smt. G.G. Khadase Arts & Sci. College, **Muktainagar.** |
| 102 | Raver Parisar Shikshan Prasarak Mandals Arts, Com. & Sci., College, **Raver.** |
| 103 | Dhanaji Nana Arts, Sci. & Com., College, **Faizpur** |
| 104 | Tapti Edn. Society's Bhusawal Arts, Sci. & P. O. Nahata Comm. College, **Bhusawal.** |
| 105 | Gitabai Dattatrya Mahajan Arts, Shri Keshrimal Rajmal Navlakha Com. & Manoharsheth Dhariwal Sci. College, **Jamner.** |
| 106 | Khandesh College Edn. Society's M. J. College of Arts, Sci. & Com., **Jalgaon.** |
| 107 | R.S.S.P.Manal's Nanasaheb Yashwantrao Narayanrao Chavan Arts, Sci. & Com. College, **Chalisgaon.** |
| 108 | Pachora Taluka Co-op Edn. Society's Arts, Sci. & Com. College, **Pachora.** |
| 109 | Dadasaheb D.S.Patil, Arts, Sci. & Com. College, **Erandol.** |
| 110 | M.G.T.S.M's Arts, Sci. & Com. College, **Chopda.** |

| Collection Centre No. | Place of Collection Centre |
|---|---|
| 111 | K.E.M.'s. Pratap College of Arts, Sci. & Com., **Amalner.** |
| 112 | K.V.P.S.'s Arts, Com. & Sci. College, **Parola.** |
| 113 | P. R. H.S.'s Arts, Science & Commerce College, **Dharangaon.** |
| 114 | JDMVPS.'s Arts, Sci., & Com.College, **Yawal** |
| 115 | Arts, Com. & Science College, **Bodwad** |
| 116 | M.D. Palesha Commerce College, **Dhule.** |
| 117 | Vidya Vikas Mandal's Arts, Sci. & Com. College, **Sakri.** |
| 118 | K.V.P.M.'s Smt.P.D.M. Arts, Smt. H.D.Com. & S.M.A. Sci. College, **Shirpur.** |
| 119 | S.S.V.P.S's S.D. Patil Arts, Com. & Sci. College, **Shindkheda.** |
| 120 | S.S.V.P.S's Smt. Bagal Arts & Com. College, **Dondaicha.** |
| 121 | P.E.S.'s Arts, Sci. & Com. College,**Pimpalner** |
| 122 | P.S.G.V.P.M's Sci., Com. & S.I.Patil Arts College, **Shahada.** |
| 123 | A.S.M's C.H.C. Arts, Sci. & S. G. P. Com. College, **Taloda.** |
| 124 | Shri S.H.Naik College of Education, **Navapur.** |
| 125 | V.V.M's Arts & Com. College, **Akkalkuwa.** |
| 126 | Jijamata Arts, Sci. & Com. College, **Nandurbar.** |

५) Online अर्ज भरण्यासाठी अंतिम दिनांक ०५ जुलै,२०१७ राहील. तसेच सदर अर्जाची छापील प्रत व आवश्यक कागदपत्र वरील मुद्दा क्र.०४ मध्ये नमूद केलेल्या केंद्रावर दि.१९/०६/२०१७ पासून दि.०६/०७/२०१७ पर्यंत कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत जमा करावेत.

६) ज्या पदवीधरांनी आपले नाव बदललेले असेल, त्यांनी या अधिसूचनेसोबत जोडलेले स्वयं-घोषणापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

७) पदवीधरांनी आपल्या अर्जासोबत खालील कागदपत्र जोडावीत.

अ) पदवी प्रमाणपत्र;
ब) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना ) यापैकी एक
क) नाव बदलले असल्यास स्वयं-घोषणापत्र व नाव बदलाबाबतचा एक पुरावा (लग्नपत्रिका/विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र इ.)

८) दि. ०६/०७/२०१७ पर्यन्त ज्या पदवीधराचा नोंदणी अर्ज व मतदार यादीत नाव येण्यासाठी अर्ज प्राप्त होईल, अशाच त्याच पदवीधरांचा सन २०१७ मध्ये होणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांच्या दहा जागांच्या निवडणुकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून मतदार यादीत समावेश केला जाईल.

**पदवीधर गटात नाव नोंदणीसाठी व नोंदणीकृत पदवीधर गटाच्या निर्वाचक गणामध्ये मतदार म्हणून नोंद होण्यासाठी** दि.०६/०७/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजेनंतर विद्यापीठ कार्यालयास अथवा वरील केंद्रावर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१५/६/१७

९) सन २०१५ मध्ये ज्या पदवीधरांनी आपले नाव नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत नोदविणेसाठी तसेच मतदार म्हणून मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्यासाठी अर्ज केला असेल व विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या वैध अर्जदारांच्या यादीत त्यांच्या नावांचा समावेश असेल अशा पदवीधरांना विद्यापीठाचे निदेश क्र.०५/२०१७ नुसार कोणताही अर्ज भरण्याची आवश्यकता नाही, त्यांची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

तथापि, सदर पदवीधरांचा निवासाचा पत्ता बदललेला असल्यास त्यांनी वरील मुद्दा क्र.०७ (ब) मधील पुराव्यासह आपला स्वतंत्र अर्ज विद्यापीठाच्या वरील नमूद केंद्रावर जमा करावा.

१०) प्रत्येक नोंदणीकृत पदवीधराने Online Form मध्ये कमीत कमी ०३ मतदान केंद्र निवडणे आवश्यक आहे. नोंदणीकृत पदवीधरांनी निवडलेल्या तीन मतदान केंद्रांपैकी एका मतदान केंद्रावर संबंधितास मतदान करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

११) नोंदणीकृत पदवीधरांसाठी मतदान केंद्रांची यादी खालील प्रमाणे राहील :

| Polling Centre No. | Polling Centre |
|---|---|
| 101 | Muktainagar. |
| 102 | Raver. |
| 103 | Faizpur |
| 104 | Bhusawal. |
| 105 | Jamner. |
| 106 | Jalgaon. |
| 107 | Chalisgaon. |
| 108 | Pachora. |
| 109 | Erandol. |
| 110 | Chopda. |
| 111 | Amalner. |
| 112 | Parola. |
| 113 | Dharangaon. |
| 114 | Yawal |
| 115 | Bodwad |
| 116 | Dhule |
| 117 | Sakri. |
| 118 | Shirpur. |
| 119 | Shindkheda. |

| Polling Centre No. | Polling Centre |
|---|---|
| 120 | **Dondaicha.** |
| 121 | **Pimpalner** |
| 122 | **Shahada.** |
| 123 | **Taloda.** |
| 124 | **Navapur.** |
| 125 | **Akkalkuwa.** |
| 126 | **Nandurbar.** |

१२) **ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सूचना :**

१) ऑन लाईन अर्ज भरतांना पदवीधराने प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात.

२) पदवी प्रमाणपत्रावरील पदवी सांकेतांक (Degree Code) अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (पदवी प्रमाणपत्रावर पदवी सांकेतांक (Degree Code) प्रमाणपत्राच्या उजव्या बाजूला खालच्या कोपऱ्यात असून आडव्या पदवी प्रमाणपत्रावर सदर कोड काही प्रमाणपत्रांवर पदवी प्रमाणपत्राच्या उजव्या बाजूस खाली कोपऱ्यात किंवा मागील बाजूस आहे.)

३) Online अर्ज भरण्यापूर्वी पदवीधरांनी आपले पदवीप्रमाणपत्र PDF Format मध्ये व 500 Kb size मध्ये तसेच फोटो JPG Format मध्ये व 96 to 150 dpi मध्ये स्कॅन करावा.

१३) अपूर्ण असलेले अर्ज नस्तीबध्द करण्यात येतील व त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४) निदेश, निवडणूक कार्यक्रम, मतदार याद्या इ. बाबी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर www.nmu.ac.in/election या link वर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील व त्याबाबतची सूचना बातमीरुपाने वृत्तपत्रातून दिली जाईल. वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील माहिती सर्व संबंधितांनी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे.

तरी संबंधितांनी विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यास सहकार्य करावे, ही विनंती.

जा.क्र. : उमवि/२/निवडणूक/१४/२०१७
दिनांक : १५/०६/२०१७

(प्रा. अं. बा. चौधरी)
प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

सोबत : **स्वयं-घोषणापत्र नमुना**

# स्वयं-घोषणापत्र

मी, श्री./सौ./श्रीमती ______________________________ खाली सही करणार, या स्वयं-घोषणापत्राव्दारे खालील प्रमाणे घोषित करत आहे :

१) माझे पूर्वीचे नाव ______________________________ असे असून माझ्या पदवी प्रमाणपत्रावर ________________________ सदर नाव नमूद केले आहे.

२) # ______________________________ या कारणास्तव माझे सदर नाव बदलून ______________________________ असे झाले आहे.

३) मी माझ्या बदललेल्या नावाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यापीठाच्या अधिसभेच्या सन २०१७ मध्ये होणा-या नोंदणीकृत पदवीधर निवडणुकीसाठी नोंदणी करु इच्छितो / इच्छिते. माझ्या बदललेल्या नावाच्या पुष्टयर्थ मी ● ______________________________ ची स्व-साक्षांकीत छायांकीत प्रत सोबत जोडली आहे.

वर नमूद केलेली माहिती खरी व बरोबर असून त्यामधील कोणताही मजकूर चुकीचा आढळल्यास होणा-या परिणामांची जबाबदारी सर्वस्वी माझ्यावर राहील. अशा परिस्थितीत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास माझ्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करता येईल, याची मला जाणीव आहे.

सही

संपूर्ण नाव:____________________

मतदार यादीतील क्रमांक (असल्यास):________

\# नाव बदलाचे कारण नमूद करावे.

● बदललेले नाव दर्शविणारी कागदपत्र नमूद करावीत.

15/6/17